# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २१ । अंक १४९। सोमवार, दि. १६ मार्च २०२६ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


### युद्धाचा उद्योग क्षेत्राला मोठा फटका

**मुंबई ।** इराण इस्त्रायल युद्धामुळे ५० टक्के कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. आशिया खंडातील सर्वात मोठी उद्योग नगरी म्हणून ओळख असणाऱ्या नवी मुंबईतील ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील तब्बल साडेचार हजार कंपन्यांना आखाती देशातील युद्धाचा फटका बसला आहे. आयात निर्यात ठप्प असल्याने आणि कच्च्या मालाचे भाव वाढल्याने पुढील आठवड्यात यातील ५० टक्के कारखाने बंद पडण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. नवी मुंबईतील १० लाख कामगारांवर उपासमारीची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

### फास्टॅग पासची किंमत वाढली

**नवी दिल्ली ।** राष्ट्रीय महामार्गावरुन वारंवार प्रवास करत असाल तर तुम्हाला टोल पास उपयोगी ठरतो. मात्र, आता या पासच्या किंमती वाढणार आहे. १ एप्रिलपासून तुम्हाला वार्षिक फास्टॅग पाससाठी जास्त रक्कम मोजावी लागणार आहे. नॅशनल हायवे ऑथोरिटी ऑफ इंडियाने याबाबत निर्णय घेतला आहे. या टोल किंमतीत वाढ केली आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्गाच्या वार्षिक टोल पासची किंमत ३००० रुपयांवरुन ३०७५ रुपये करण्यात आली आहे. हे दर आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी आहेत.

## संपादकीय

### आधी दिल्ली, आता लडाख

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री व आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना तथाकथित मद्य घोटाळ्यातून विशेष सीबीआय न्यायालयाने निर्दोष मुक्त केल्यानंतर आता लडाखमधील पर्यावरणवादी व सामाजिक नेते सोनम वांगचूक यांच्या कारावास प्रकरणातही केंद्र सरकारचा मुखभंग झाला असल्याचे म्हटले पाहिजे. केजरीवाल आदी मंडळींना तुरुंगातून मुक्त करण्याचा आदेश देताना सीबीआय न्यायालयाने केंद्र सरकारची चांगलीच कानउघाडणी केली होती. वांगचूक प्रकरणात भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने अत्यंत हुशारी दाखवत ती वेळच येऊ दिली नाही. राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली वांगचूक यांना गेल्या वर्षी २६ सप्टेंबरला ताब्यात घेण्यात आले होते. राष्ट्रीय सुरक्षेला त्यांच्यापासून धोका असल्याचा आरोप ठेवून त्यांना जोधपूर तुरुंगात ठेवण्यात आले होते. त्यांच्या पत्नी गीतांजली यांनी केंद्र सरकारच्या या कारवाईला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या कारवाईवरील सुनावणी १७ मार्चला होणार होती. ती होण्याआधीच तीन दिवस केंद्रीय गृहमंत्रालयाला आता देशाला वांगचूक यांच्यापासून धोका उरलेला नसल्याचा साक्षात्कार झाला आणि लडाखच्या जनतेवर मेहरबानी करत असल्याचा आव आणून त्यांच्यावरील रासुकाअंतर्गत कारवाईच रद्द करण्यात आली. न्याय संस्थेकडून पुन्हा एकदा शाब्दिक फटके खाण्यापेक्षा त्यातल्या त्यात सोपा असा कारवाई मागे घेण्याचा मार्ग सरकारने निवडला आहे, असेच म्हणावे लागेल. या दोन्ही प्रकरणांमुळे केंद्रीय यंत्रणा किती घिसाडघाईने निष्कर्षाला येतात हे स्पष्ट झाले आहे. हे अनवधानाने नव्हे तर काही तरी हेतू ठेवून केले जात असल्याने त्याची गांभीर्याने दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. मुळातच, केंद्रीय यंत्रणांच्या नि:पक्षपातीपणावर प्रश्नचिन्ह उमटलेले असताना कोणतीही कारवाई विचारपूर्वक करणे गरजेचे बनलेले असताना घडते मात्र उलटेच. केजरीवाल व त्यांच्या सहकाऱ्यांना विनाकारण दोन वर्षे तुरुंगात व्यतित करावी लागली होती. खोटेनाटे आरोप लावून निवडणूक जिंकू शकणाऱ्या पक्षाच्या पान २ वर

# सरकार म्हणते गॅसटंचाई नाही; गावागावांत मात्र भीषण स्थिती

## पीएनजी गॅस कनेक्शन असलेल्यांना एलपीजी गॅस कनेक्शन सोडावे लागणार-केंद्र सरकार



**मुंबई ।** देशातील वाढत्या गॅस टंचाईवर सरकारने भूमिका मांडली असून घरगुती गॅसधारकांसाठी कुठलाही तुडवटा नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. मात्र, केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलिंडरच्या बुकिंगचा कालावधी वाढवला असून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठाही बंद करण्यात आला आहे. त्यामुळे, सरकार गॅसटंचाई नाही असे सांगत असले तरीही गॅसटंचाई गावागावात जाणवत आहे. त्यातच, केंद्र सरकारने आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून आता पीएनजी गॅस कनेक्शन असलेल्यांना एलपीजी गॅस कनेक्शन सोडावे लागणार आहे. त्यामुळे, आखाती देशात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम नागरिकांच्या घरातील किचनवर झाल्याचे दिसून येत आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयाने घरगुती गॅस कनेक्शनसंदर्भात महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, ज्या लोकांकडे पाईपने गॅस पुरवठा होतो, त्या नागरिकांना आता एलपीजी गॅस कनेक्शन सोडावे लागणार आहे. त्यामुळे, पीएनजी कनेक्शन वापरकर्त्या ग्राहकांना एलपीजी गॅस कनेक्शन तत्काळ सरकारकडे जमा करावे लागेल. केंद्रीय मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, ज्यांच्याकडे कनेक्शन आहे, ते सरकारी तेल कंपन्यांच्या डिस्ट्रीब्यूटर्सकडून सिलिंडरसाठी पुरवठा प्राप्त करू शकणार नाहीत. घरगुती गॅसच्या उत्तम नियोजन आणि वाटपासाठी घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. पीएनजी आणि एलपीजी गॅस कनेक्शन एकत्र ठेवल्याने गॅस पुरवठ्यामध्ये असमानता, काळाबाजार आणि संस्थाच्या अनावश्यक दुहेरी वापराची अडचण निर्माण होते. त्यामुळेच, ग्राहकांना एकाच गॅस कनेक्शनद्वारे घरगुती गॅसचा पुरवठा केला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### सिलिंडरचा होतोय काळाबाजार

इराण इस्त्राईल अमेरिका युद्धाच्या झळा जगभराला बसत आहेत.त्यामुळे सर्वत्र इंधन व गॅस टंचाई भासू लागली आहे. भारतात गॅस टंचाई प्रकर्षाने जाणवू लागलेली असल्याने शासनाने व्यावसायिक गॅस सिलिंडर पुरवठा बंद केला आहे. त्यामुळे, अनेक भागात व्यावसायिक गॅस सिलिंडरची काळाबाजारी सुरू झाली आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी शिधावाटप कार्यालयाच्या नियंत्रणाखाली भरारी पथक नेमून कारवाई करण्यात सुरुवात केली असल्याची माहिती मिळाली आहे.

# विधानसभा निवडणूक जाहीर

## प.बंगालसह तामिळनाडू, आसाम, पुद्दुचेरी अन् केरळमध्ये वाजला बिगुल



**नवी दिल्ली ।** महाराष्ट्रातील निवडणुकांचा गुलाल उधळून झाल्यानंतर आता पुढील तीन वर्षे राज्यात कुठल्याही मोठ्या निवडणुकांची बिगुल वाजणार नाही. मात्र, देशातील ५ राज्यांत विधानसभा निवडणुकांचे रणशिंग फुंकले जात असून केंद्रीय निवडणूक आयोगाने दि. १५ मार्च रोजी पत्रकार परिषद घेत निवडणुकांची घोषणा केली आहे.

देशाचे लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालसह, तामिळनाडू, आसाम, पुद्दुचेरी आणि केरळ राज्यात निवडणुका होत आहेत. केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली. विशेष म्हणजे या ५ राज्यांच्या निवडणुकांची तारीख जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार, प. बंगालमध्ये दोन टप्प्यात निवडणुका होत असून २३ आणि २९ एप्रिल



रोजी मतदान होणार आहे. गेल्या काही दिवसात निवडणूक आयोगाने सर्व राज्यांचा दौरा केला, तयारीचा आढावा घेतला. आयोगाने सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची भेट घेतली, त्यांच्या सूचनांचा स्वीकार केला. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांची भेट घेतली. प्रशासनाने केलेल्या कामगिरीबद्दल अभिनंदन केल्याचे ज्ञानेश कुमार यांनी म्हटले आहे. निवडणुका होत असलेले पाचही राज्य भौगोलिक आणि सांस्कृतिक भारताच्या विविधतेचे प्रतिनिधित्व करतात, असे म्हणत त्यांनी मतदारसंख्या आणि मतदान कर्मचारी, यंत्रणा याबाबत माहिती दिली.

### निवडणुकांच्या तारखेची घोषणा

आसाममध्ये सर्व १२५ मतदारसंघात एका टप्प्यात तसेच केरळमध्येही १४० विधानसभेसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. ९ एप्रिल रोजी मतदान आणि ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. तामिळनाडूतील २३४ विधानसभेसाठी एका टप्प्यात २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. तर, पश्चिम बंगालमध्ये २९४ विधानसभा मतदारसंघासाठी दोन टप्प्यात १५२ आणि १४२ मतदारसंघात अनुक्रमे २३ आणि २९ एप्रिल मतदान होणार आहे. या सर्व विधानसभा निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी होणार आहे.

### २०२१ मध्ये झाल्या होत्या निवडणुका

देशात निवडणुका जाहीर करण्यात आलेल्या पाचही राज्यातील विधानसभांचा कार्यकाळ मे महिन्यात संपुष्टात येत आहे. गत २०२१ मध्ये या राज्यांमधील निवडणुकांची घोषणा २६ फेब्रुवारी रोजी करण्यात आली होती. त्यावेळी, प. बंगालमध्ये ८ टप्प्यांत निवडणुका झाल्या, आसाममध्ये ३ टप्पे तर तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरीमध्ये एकाच टप्प्यात मतदान झाले होते.

### १७.४ कोटी मतदार, २५ लाख कर्मचारी

५ राज्यातील मतदारांची संख्या एकूण १७.४ कोटी एवढी आहे, तर ८२४ एकूण विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदान प्रक्रियेसाठी एकूण मतदान केंद्रांची संख्या २.१९ लाख असून एकूण कर्मचारी २५ लाख कार्यरत आहेत, अशी माहितीही आयोगाने दिली.

## बारामती, राहुरीची पोटनिवडणूक जाहीर

### २३ एप्रिलला मतदान तर ४ मे रोजी होणार मतमोजणी





**मुंबई ।** महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. राहुरी आणि बारामतीसाठी २३ एप्रिलला मतदान होईल तर मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे. भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झालेली आहे. तर, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला झालेल्या विमान अपघातात निधन झाले. यामुळे बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त आहे. या दोन्ही जागांची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. भाजपचे राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे १७ ऑक्टोबर २०२५ ला निधन झाल्याने ती जागा रिक्त होती. या जागेवर माजी आमदार प्राजक्त तनपुरे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असल्याची सूत्रांची माहिती आहे.

### सुनेत्रा पवार लढणार बारामतीची जागा

बारामतीची जागा राष्ट्रवादी काँग्रेस लढवणार असून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या जागेवर लढणार असल्याचे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितले आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवार दिला जाणार नसल्याची माहिती आहे.

- बारामती आणि राहुरीचा पोटनिवडणूक कार्यक्रम
  निवडणुकीची अधिसूचना जारी : ३० मार्च २०२६
- अर्ज दाखल करण्याची मुदत : ६ एप्रिल २०२६
- अर्जांची छाननी : ७ एप्रिल २०२६
- अर्ज मागे घेण्याची मुदत : ९ एप्रिल २०२६
- मतदानाची तारीख : २३ एप्रिल २०२६
- मतमोजणी : ४ मे २०२६

## मुंबईच्या महापौर अडकल्या लाल दिव्यात

**मुंबई ।** महापालिकेच्या नवनिर्वाचित महापौर रितू तावडे सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. त्यांच्या नव्या अधिकृत गाडीवर लावलेल्या लाल आणि निळ्या दिव्यांमुळे चर्चा सुरू आहे. केंद्र सरकारने २०१७ मध्ये सामान्य सरकारी वाहनांवर लाल दिवा, नामफलक, ध्वज किंवा अधिकार दर्शवणारी चिन्हे लावण्यास बंदी घातली होती. त्यानंतर आता रितू तावडे यांच्या गाडीला लावलेले लाल-निळे दिवे पाहून अनेकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.



दरम्यान, देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी त्याची माहिती घेतली. लाल दिवा गाडीवर वैगरे नव्हता. पण बोनेटच्या ठिकाणी लाल दिवा होता. त्याच्यामध्ये महापौरांचा काहीच दोष नाहीये. त्यासंदर्भात राज्यामध्ये कोणीही लाल दिवे वापरु नयेत, हा जुनाच आपला नियम आहे. त्यामुळे महापौरांना त्याची कल्पना आहे. मला असे वाटतंय की, त्यांना विनाकारण टार्गेट करण्याचा प्रयत्न आहे. अशाप्रकारे टार्गेट करणे योग्य नाही.




**अहिल्यानगर ।** राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या ३९ व्या पदवीप्रदान समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यपालांच्या हस्ते डॉक्टर ऑफ सायन्स या मानद पदवीने सन्मानित करण्यात आले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे, भारतीय कृषी संशोधन संस्थेचे (आयसीएआर) माजी संचालक डॉ. अशोक कुमार सिंह, कुलगुरू डॉ. विलास खर्चे आदी उपस्थित होते.

## नेपाळमध्ये भाविकांच्या बसला अपघात

### सात जणांचा मृत्यू, सात जण गंभीर जखमी

**काठमांडू ।** नेपाळमधील प्रसिद्ध मनकामना देवीचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भारतीय भाविकांच्या बसला भीषण अपघात झाला आहे. गोरखा जिल्ह्यातील साहिद लखन गावालगत ही बस खोल दरीत कोसळल्याने किमान सात भारतीय भाविकांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर सात जण गंभीर जखमी झाले आहेत. शनिवारी संध्याकाळी मनकामना मंदिरातून दर्शन घेऊन ही इलेक्ट्रिक मायक्रो-बस अनबुखैरेनीच्या दिशेने जात असताना कांत्तर भागात एका तीव्र उतारावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट दरीत कोसळली. स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, बसमध्ये १५ प्रवासी होते. अपघातात जखमी झालेल्या सात भाविकांना तातडीने उपचारासाठी चितवन येथील चितवन मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. नेपाळ पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य राबवून मृतदेह बाहेर काढले आहेत. मृतांची ओळख पटवण्याचे काम अद्याप सुरू आहे.

### केळी भाव

नवती (१) : 1875
नवती (२) : 1725

### मिश्कीली




## शेअर बाजारात २६ लाख कोटी पाण्यात, आज गूड न्यूज?

**मुंबई ।** पश्चिम आशियातील युद्धाचे ढग गडद झाल्यामुळे भारतीय शेअर बाजारात सध्या मोठी विक्री पाहायला मिळत आहे. अवघ्या नऊ दिवसांच्या सत्रात गुंतवणूकदारांचे तब्बल २६.७७ लाख कोटी रुपये मातीमोल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर, भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाचे अध्यक्ष तुहिन कांत पांडे यांनी गुंतवणूकदारांना घाबरून न जाता संयम राखण्याचे आवाहन केले आहे. इस्त्रायल आणि अमेरिका यांनी २८ फेब्रुवारी रोजी इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर जागतिक बाजारपेठेसह भारतीय बाजारपेठेतही घबराट पसरली. या युद्धाच्या परिणामामुळे २ मार्चपासून बाजारात मोठी घसरण सुरू झाली. २ मार्च ते १३ मार्च या नऊ दिवसांच्या कालावधीत मुंबई शेअर बाजाराचे बाजार भांडवल २६,७७,२६३.६९ कोटींनी घटले आहे. होळी आणि शनिवार-रविवारच्या सुट्ट्या वगळता, प्रत्येक सत्रात गुंतवणूकदारांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागला आहे. दरम्यान, पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १६ मार्च रोजी भारतीय बाजार हिरवागार होण्याचे संकेत आहे.

# मुख्यमंत्री ममता दीदींचा मास्टरस्ट्रोक!

## निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेला अवघा दीड तास बाकी असतानाच केल्या घोषणा



**कोलकाता ।** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीची घोषणा होण्याच्या दीड तास आधी, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पुजारी आणि मुएझिन (प्रार्थनेसाठी अजान देणारे) यांच्या मानधनात ५०० रुपयांनी वाढ केली. आता त्यांना दरमहा २००० मिळतील. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी समुदायांचे आध्यात्मिक आणि सामाजिक जीवन राखण्यात पुजारी आणि मुएझिन महत्त्वाची भूमिका बजावतात. सरकारने मानधन योजनेअंतर्गत पुजारी आणि मुएझिनसाठी सर्व नवीन अर्जांना मान्यता दिली आहे. बंगालमध्ये दि. १५ मार्च रोजी आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. बंगालमध्ये दोन टप्प्यात मतदान होणार आहे. ९ एप्रिल रोजी मतदान ४ मे रोजी निकाल घोषित होणार आहे. यादरम्यान, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्य सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी एक मोठी घोषणा देखील केली. राज्य सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांना आणि पेन्शनधारकांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत २००९ अंतर्गत महागाई भत्ता आणि थकबाकी देण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्र्यांच्या मते, राज्य सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारक, शिक्षक तसेच पंचायत, नगरपालिका आणि इतर स्थानिक संस्थांसारख्या अनुदानित संस्थांचे कर्मचारी आणि पेन्शनधारक यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे.

### अंतिम यादीत ७.०४ कोटींहून अधिक मतदार

पश्चिम बंगालमध्ये विशेष सघन सुधारणानंतर, १ मार्च रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात आली. मतदारांची संख्या ७.६६ कोटींवरून ७०,४५९,२८४ झाली आहे. याचा अर्थ असा की आतापर्यंत ६३.६६ लाख नावे काढून टाकण्यात आली आहेत, जी एकूण मतदारांच्या ८.३ टक्के आहेत. २०२१ च्या निवडणुकीत २९४ जागांपैकी १६६ जागांवर विजयाचे अंतर २५००० पेक्षा कमी होते. ५००० पेक्षा कमी मतांनी ३६ जागांपैकी भाजपने २२ आणि तृणमूल काँग्रेसने १३ जागा जिंकल्या होत्या.

## पुण्यात विद्यार्थ्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

**पुणे ।** वाघोली परिसरात किरकोळ वादातून विद्यार्थ्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे हल्ल्यावेळी आरोपीने मारलेला कोयता विद्यार्थ्याच्या डोक्यातच अडकून राहिल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ही संपूर्ण थरारक घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. वाघोलीमधील रायसोनी कॉलेजसमोर ही भीषण घटना घडली. नागेश जगताप हा विद्यार्थी आपल्या मित्रासोबत हॉटेलसमोर चहा पिण्यासाठी थांबला होता. त्यावेळी जुन्या वादाचा राग मनात धरून आरोपी मंगेश सांगळे आपल्या दोन साथीदारांसह तेथे आला. तू मला शिवी का दिली? असा जाब विचारत आरोपींनी अचानक नागेशवर कोयत्याने सपासप वार करण्यास सुरुवात केली. आरोपीने मारलेला कोयता नागेशच्या डोक्यातच अडकून राहिला. जखमी विद्यार्थ्यांवर रुग्णालयात उपचार सुरू असून पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून एका आरोपीला अटक केली आहे.